


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com  RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे  अंक : ३१५ वा  सोमवार दि ०९ मार्च २०२६  पृष्ठ ८  किंमत३ रुपये

# काँग्रेस-सपा नगरसेवकांकडून ठाकरेंचा गेम, प्रभाग समिती अध्यक्ष निवडणुकीत श्रद्धा जाधवांचा एका मताने पराभव

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महापालिकेच्या १७ पैकी ६ प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी गुरुवारी झालेल्या निवडणुकीत तीन प्रभाग समिती अध्यक्षपदी भाजपचे नगरसेवक बिनविरोध निवडून आले. अन्य तीन प्रभाग समित्यांमध्ये, शिवसेनेने एक, तर काँग्रेसने दोन समिती अध्यक्षपदे पटकावली. या सहा प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीठासीन अधिकारी म्हणून महापौर रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी यांनी कामकाज पाहिले. चुरशीच्या ठरलेल्या एफ उत्तर व एफ दक्षिण प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत संख्याबळ अधिक असल्याने शिवसेना (उबाठा) पक्षास समिती अध्यक्षपद मिळण्याचा होरा असतानाच ऐनवेळी काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे नगरसेवक गैरहजर राहिले. यामुळे ङ्गउबाठाफ्च्या श्रद्धा जाधव यांचा शिवसेनेच्या उमेदवार मानसी सातमकर यांनी केवळ एका मताने पराभव केला. या निवडणुकीसाठी काँग्रेसने व्हिप जारी केला असतानाही काँग्रेसच्या नगरसेविका आयशा सूफियान वणू, सपच्या इरम सिद्दिकी गैरहजर राहिल्याने मानसी सातमकर यांना भाजपची पाच आणि शिवसेनेची तीन अशी आठ मते मिळाली. श्रद्धा जाधव यांना ङ्गउबाठाफ्ची सहा आणि मनसेचे एक अशी सात मते मिळाली. त्याचवेळी, अन्य पाच प्रभाग समित्यांच्या निवडणुकीत, भाजपचे तीन नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून, काँग्रेस पक्षाचे दोन नगरसेवक अध्यक्षपदी निवडून आले आहेत. आर मध्य आणि आर उत्तर प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षाने एकही उमेदवार न दिल्याने सत्ताधारी भाजपचे नगरसेवक प्रकाश दरेकर यांची बिनविरोध निवड झाली. ङ्गसीफ आणि ङ्गडीफ प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार आकाश पुरोहित यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची व आर दक्षिण प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपच्या लीना देहरकर यांची बिनविरोध निवड झाली. पी पूर्व आणि पी पश्चिम प्रभाग समिती अध्यक्षपद निवडणुकीत काँग्रेसचे



उमेदवार हैदरअली अस्लम शेख हे १० मते मिळवून निवडून आले. ए, बी आणि ई प्रभाग समितीच्या अध्यक्षपद निवडणुकीत काँग्रेसचे नगरसेवक ज्ञानराज निकम यांची निवड झाली.

# सुप्रिया सुळेंकडून बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा...

वृत्तसंस्था/मुंबई

: राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचा आज राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यात आला. अर्ज दाखल केल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक प्रतिक्रिया दिली. आपण जेव्हा पहिल्यांदा राज्यसभेत गेलो तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी खुल्या मनाने पाठिंबा दिला होता. त्यामुळे ती निवडणूक बिनविरोध झाली होती, अशी आठवण सुप्रिया सुळे यांनी सांगितली. त्याचबरोबर आता शरद पवारांच्या ६ दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीनंतर त्यांना पुन्हा राज्यसभेच्या उमेदवारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून पाठिंबा मिळाला. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी उद्धव ठाकरे यांचे आभार मानले. २० वर्षांनी असा योगायोग आल्याचं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षाचेदेखील आभार मानले. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्याला फोन केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मी उद्धव ठाकरे यांना भेटायला गेले होते. त्यानंतर मी आज संध्याकाळी साडेसहा वाजता पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी भेटायला जाणार आहे. उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संपूर्ण कुटुंबाला भेटायला जाणार आहे. त्याचबरोबर काँग्रेस पक्ष, काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणूगोपाल, मल्लिकार्जुन खर्गे, रमेश चेन्नीथला या सर्व नेत्यांचे मन:पूर्वक आभार मानते, अशा भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या. मला मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, तुझ्या वडिलांनंतर केवळ दोन-तीन वर्षच मी राजकारणात उशिरा आलो. पण गेल्या सहा दशकांपासून आम्ही राजकारणात एकत्र आहोत. मला दिग्विजय सिंह यांचादेखील फोन आला. कमलनाथ यांचा फोन आला. ही सर्व ६ दशकांची प्रेमाची नाती आहेत. शरद पवार पुन्हा राज्यसभेत जात असल्याने या सर्वांना आनंद झाला. मी उद्धव ठाकरे यांचे आणि प्रत्येक शिवसैनिकाचे अंत:करणातून आभार मानते, अशादेखील भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या. योगायोग बघा, मी २००६ मध्ये राज्यसभेत पहिल्यांदा गेले, त्यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे हयात होते. माझी निवडणूकदेखील बिनविरोध झाली होती. त्यानंतर २० वर्षांनी बाळासाहेब आपल्यात नाहीत, पण काँग्रेस पक्ष आणि शिवसेना, आता जे चित्र दिसतंय, महाराष्ट्राच्या सर्वच पक्षांनी सामंजसपणा



दाखवलेला दिसतोय, निवडणूक बिनविरोध होईल, असं चित्र आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे सगळेच पक्ष सामंजसपणे आणि सुसंस्कृत महाराष्ट्राचे दर्शन होताना दिसत आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. माजी दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा जो महाराष्ट्र होता, त्यामध्ये विरोधक हा आपला शत्रू नव्हता, ही आपली वैचारिक लढाई आहे, असा विचार होता. हीच संस्कृती आज आपल्याला या निवडणुकीत दिसत आहे. आपल्या सगळ्यांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. हीच तर महाराष्ट्राची खरंच आण, बाण आणि शान आहे. महाराष्ट्राची संस्कृती जपवण्यासाठी सगळेच प्रयत्न करत आहेत. ही आनंदाची आणि समाधानाची गोष्ट आहे, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# अभिनयवस्त्रातले अनुभवांचे चमकते धागे



नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा म (एनएसडी) मध्ये शिकत असताना आमच्या ङबॅचफने काही ङओपन एअरफ नाट्यप्रयोग केले. असं म्हणतात, की लेखकाने लिहिलेली वाक्यं दिग्दर्शकाने दाखवलेल्या दिशेने जात समोरच्या प्रेक्षकापर्यंत पोहोचवणं याच्या पलीकडे जायला एनएसडीने आणि आमचे गुरू इब्राहीम अलकाझी यांनी शिकवलं. आम्ही बलवंत गार्गी यांनी लिहिलेलं ङसुलतान रझियाफ हे नाटक बसवलं होतं आणि ते दिल्लीतल्या ङपुराना किलाफ या ठिकाणी केलं होतं. यात मी ङरझियाफ साकारली होती. आपण जेव्हा बंदिस्त नाट्यगृहात प्रवेश सादर करतो तेव्हा आपल्या हाताशी अनेक सुविधा असतात. पण ङपुराना किलाफमध्ये हे काहीच नव्हतं. सगळंच आम्हाला मोकळ्या जागेवर करायचं होतं. प्रेक्षकही आमच्यासमोरच असणार होते. अशा ठिकाणी नाटक करायचं झाल्यास कोणतं भान बाळगावं, काय करावं, कशी रचना करावी, वेशभूषा-रंगभूषा कशी आणि कुठे करावी हे सगळं आम्ही या प्रत्यक्ष सादरीकरणाच्या निमित्तानं शिकलो. आमच्याकडे ङलेपल्स माइकफ नव्हते. म्हणजे तेवढी आवाजाची फ ेक आम्हाला साधायची होती. पुराना किलाच्या खालच्या कमानीच्या वर आमचा मुख्य रंगमंच किंवा ङफ्लोअरफ होता. त्याचपुढे तिसरी कमान होती. या दोन कमानींच्या शेजारी बुरुजांसारखे उंचवटे आहेत. त्या बुरुजात आमची मेकअप रूम तयार केली होती! आम्ही तिथं मेकअप करायचो आणि आतल्या छोट्या भुयारसदृश दरवाजातून मुख्य पायऱ्यांवर यायचो. जिथे आवश्यक होतं तिथं सरांनी लाकडी सेट करून घेतला होता. अर्धा भाग हा पुराना किला या वास्तूचा वापरला होता. वरच्या तीन छोट्या कमानींचाही वापर आम्ही सीन्स करण्यासाठी केला होता, जणू आमचा रंगमंच हा दुमजली असावा! रझियाचे वडील मरतात आणि हे तिला जनतेला सांगायचं होतं. मग ती पायऱ्यांवरून धावतधावत वरच्या लेव्हलवर जाते. या एकेक फुटी उंच अशा (त्यावेळच्या मूळ पायऱ्या) तब्बल २५ पायऱ्या मला एका दमात चढून जाऊन वरच्या बुरुजासारख्या जागेवर येऊन माझे संवाद म्हणायचे होते, ङदिल्ली शहर के बाशिंदों, जब से सुल्तान इल्तुतमिश की वफात हुई, जुल्म के दरवाजे खुल गये...फ अल्तुनिया हा विद्रोही, जो रझियाला लग्नासाठी नंतर मागणी घालतो त्याच्याबरोबरचा सीन वरच्या कमानींमध्ये आम्ही केला होता. याच पायऱ्यांवर माझी तलवारबाजीही होती. अजित वाच्छानी याकूत होता आणि अल्तुनियाची भूमिका राज बब्बरने केली होती. त्या पुरातन, ऐतिहासिक वास्तूवर हे नाटक करताना अक्षरशः अंगावर रोमांच उभे राहिले होते. पुराना किलामध्ये रंगीत तालमीसाठी आम्ही अगदी सकाळी जायचो. एनएसडीने त्यासाठी एक बस करून दिली होती. सरही आमच्यासमवेत यायचे. आम्ही जवळजवळ ८-१० दिवस रंगीत तालीम केली होती. एक प्रयोग सादर करण्यासाठी कशाप्रकारे मेहनत करावी लागते, बंदिस्त नाट्यगृहातला प्रयोग आणि ओपन एअरमधला प्रयोग यासाठी काय भान बाळगावं लागतं, हे सगळं मुलांना प्रत्यक्ष अनुभवता यावं यासाठी अलकाझी सरांनी हा आमच्या अभ्यासक्रमातला प्रोजेक्ट म्हणूनच करवून घेतला होता. या नाटकातल्या माझ्या भूमिकेचा दृश्य कळसाध्याय रझियाला लढाईत मारतात तो. ती पायऱ्यांवरून गडगडत खाली येते आणि मरते असा सीन होता. मग आता त्या पायऱ्यांवरून गडगडत खाली कसं यायचं याचंही प्रशिक्षण मला दिलं गेलं. याच पुराना किलामध्ये आम्ही धर्मवीर भारती लिखित ङअंधायुगफ नाटक केलं होतं, ज्यामध्ये मी गांधारी साकारली होती. गांधारी करताना मला नाकापर्यंत मास्क दिला होता. या मास्कमुळे व्हायचं असं, की नाकाच्या खालचं काहीच दिसायचं नाही. मला तर पुराना किलाच्या पायऱ्यांवर संवाद म्हणायचे होते. विशेषतः गांधारी जेव्हा कृष्णाला शाप देते त्यावेळचं तिचं भाषण मोठं होतं. पहिल्या चार पायऱ्या, मग थोडा सपाट भाग, नंतर पुन्हा आठ पायऱ्या, मग थोडा सपाट भाग आणि शेवटी तीन पायऱ्या होत्या. त्या मी मोजून ठेवल्या होत्या. मास्कमुळे खालचं काहीच दिसायचं नाही. मग मी चाचपडत उतरावं लागायचं. माझी एन्ट्री मी मघाशी सांगितलं होतं, त्या छोट्याशा भुयारसदृश दरवाजातून होती. मग चढायच्या आणि उतरायच्या पायऱ्या मोजून ठेवायला लागायच्या. भाषा ही नाटकात दिलेल्या काळानुसार, पात्राच्या काळानुसार, पात्राच्या कौटुंबिक पार्श्वभूमीनुसार जे संवाद दिले असतील ते पात्राच्या काळातील भाषेनुसार कसं बोलायचं तेही आम्हाला शिकवलं गेलं. त्यासाठी वेगळे स्पीच क्लासेस असायचे. गांधारीची तालीम सुरू होती, तेव्हा सलग आठ दिवस सरांनी मला वेगळ्या खोलीत बसवलं होतं. तिथं ते यायचे आणि माझ्याकडून गांधारी कृष्णाला शाप देते तो मोठा संवाद म्हणून घ्यायचे. ङवो पडा है कंकाल मेरे पुत्र का, किया है ये सबकुछ कृष्ण, तुमनेही किया है यह। सुनो, आज तुम भी सुनो, मैं तपस्विनी गांधारी अपने सारे जीवन के पुण्यों का, अपने सारे पिछले जन्मों के पुण्यों का बल लेकर कहती हूँ हे कृष्ण, सुनो।...फ असा तो सगळा संवाद होता. त्यात कोणत्या शब्दांवर अधिक वजन द्यायचं, कसे उच्चार करायचे हे सगळं सर मला सांगायचे. मी म्हणत असताना ते रेकॉर्ड करायचे आणि नंतर मला ऐकवून त्यातल्या चुका दाखवायचे. मग मी पुन्हा तालीम करायचे. एखाद्या विद्यार्थ्यावर इतकी मेहनत घेणारे गुरू मिळणं हे माझं परमभाग्य होतं. ङयक्षगानफ हे कन्नड नाटक आम्ही हिंदीत केलं. यक्षगान हा पारंपरिक नाट्यप्रकार आहे, ज्यात गाणारा भागवत नावाचा माणूस आणि त्याची साथ करणारा मृदुंगवादक हे दोघे कथा सांगत जातात. त्यांच्यासमोर यक्षगानातले नट त्या कथेबरहुकूम नृत्यनाट्य करत जातात. मूळ यक्षगानमध्ये बायका काम करत नसत, पुरुषच स्त्रीपार्ट करत असत. मला वाटतं, यक्षगानमध्ये काम करणारी मी पहिली मुलगी ठरले. डॉ. शिवराम कारंथ स्वतः आम्हाला शिकवायला, आमची तालीम घ्यायला आले होते. यक्षगान मी तिसऱ्या वर्षाला असताना केलं. नसिर (नसिरुद्दिन शाह) आणि ओम ( ओम पुरी ) यांच्या बॅचला सेंडऑफ द्यायचा होता, त्या समारंभात आम्ही हे सादर केलं होतं. अंबा, अंबिका, अंबालिका या कथेवर आधारित ङभीष्मविजयफनावाचं ते यक्षगान होतं. त्या मी ङअंबाफसाकारली होती, किराताच्या भूमिकेत राज बब्बर होता.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शहांचा फडणवीसांना फोन, बरीच शोधाशोध अन नाव ठरलेलं; राज्यसभेवर कोणाला संधी?

**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या ३७ जागांसाठी मार्चमध्ये मतदान होणार आहे. यापैकी ७ जागा महाराष्ट्रातील आहेत. विधानसभेतील पक्षीय बलाबल पाहता भाजप चे ४ उमेदवार विजयी होऊ शकतात. गेल्या काही वर्षांमध्ये भाजपनं राज्यसभा, विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये धक्कातंत्राचा वापर केला आहे. त्यामुळे यंदा भाजप कोणाला संधी देणार याकडे राजकीय वतुर्ळाचं लक्ष लागलं आहे.शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस शप), फौजिया खान (राष्ट्रवादी काँग्रेस शप), रजनी पाटील (काँग्रेस), प्रियांका चतुर्वेदी (शिवसेना उबाठा), रामदास आठवले (रिपाई-आठवले), धैर्यशील पाटील (भाजप), भागवत कराड (भाजप) या सात जणांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ २ एप्रिल २०२६ रोजी संपेल. रामदास आठवले केंद्रात मंत्री आहेत. ते




भाजपच्या कोट्यातून राज्यसभेवर आहेत. दलित चेहरा असल्यानं त्यांना पुन्हा संधी मिळू शकते. त्यानंतरही भाजप आणखी तिघांना संधी देऊ शकतो.लोकसभा, निवडणुकीला अद्याप तीन वर्षांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे जातीय, प्रादेशिक समीकरणांचा विचार करुन राज्यसभेसाठी नावं निश्चित होतील, याची शक्यता कमी आहे. अशा परिस्थितीत निष्ठावंतांना संधी मिळू शकते. त्यामुळेच विनोद तावडे, विनय सहस्रबुद्धे, सुनील देवधर यांची नावं चर्चेत आहेत. २०१९ मध्ये तावडे यांचं तिकीट कापण्यात आलं. पण त्यानंतर त्यांनी अजिबात खळखळ केली नाही. पक्षानं दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी नेटानं तडीस नेल्या. २०१९ पासून ते संसदीय राजकारणात नाहीत. त्यामुळे यंदा त्यांना संधी मिळू शकते.भाजप धक्कातंत्र वापरुन कोणाकोणाला संधी देणार याबद्दल चर्चा आहे.

देवेंद्र फडणवीस २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. त्यावेळी २०१५ मध्ये राज्यसभेची पोटनिवडणूक झाली होती. काँग्रेसचे दिग्गज नेते मुरली देवरा यांची जागा त्यांच्या निधनामुळे रिक्त झाली होती. राज्यात भाजप सत्तेत येऊन अवघे काही महिने झाले असताना ही निवडणूक लागली होती. त्यावेळी रात्री उशिरा वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपच्या प्रदेश कोअर कमिटीची बैठक सुरु होती. राज्यसभेसाठी कोणाचं नाव पाठवायचं यासंदर्भात खल सुरु होता.

बैठक सुरु असताना मुख्यमंत्र्यांना दिल्लीतून अमित शहांचा फोन आला. उद्या सकाळपर्यंत अनुसूचित जातीतील नाव राज्यसभेसाठी पाठवा, अशी सूचना शहांनी केली. बैठकीत असलेले सारेच चकित झाले. राज्यसभेच्या खासदारकीसाठी चेहऱ्याचा शोध सुरु झाला. तेव्हा तिथे असलेल्या कोणीतरी अमर साबळेंचं नाव सुचवलं. पिंपरी चिंचवडमधील पक्षाचे जुने कार्यकर्ते असलेल्या साबळे यांचं नाव निश्चित करुन दिल्लीला पाठवण्यात आलं. भाजप नेतृत्त्वानं त्यांना मान्यता दिली आणि साबळे थेट खासदार झाले.

## बारामतीत आता अतिरिक्त जिल्हाधिकारी, राज्य सरकारकडून प्रस्ताव मान्य

**पुणे :** पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि प्रशासकीय यंत्रणेवरील वाढता ताण पाहता पुणे जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी पद निर्माण करण्याच्या प्रस्तावाला सरकारने मान्यता दिली आहे. पुण्यात दोन ठिकाणी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव असताना केवळ एकच बारामती येथेच पदनिर्मितीला सरकारने मान्यता दिली. त्यामुळे आंबेगावला दुसरे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद देण्याऐवजी चाकण येथे गर्दीच्या आणि वदर्ळीच्या भागासाठी अपर तहसील कार्यालय निर्माण करण्यात आले आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांचा विस्तार झाला आहे. प्रशासकीय कामांवरचा ताणही वाढला आहे. जिल्ह्यांचे भौगोलिक क्षेत्राबरोबर लोकसंख्याही वाढली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना अंतर वाढलेले आहे. त्यामुळे राज्यात अपर जिल्हाधिकाऱ्यांची ११ पदे निर्माण करण्यात यावीत, अशी एका समितीने शिफारस केली होती. त्या समितीच्या शिफारशीनुसार



नुकताच राज्य सरकारने त्याला मान्यता दिली.अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे पुनर्वसन शाखा, कुळ कायदा, महसूल, अपील शाखा याचे कामकाज चालविले जाते. तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाविरुद्ध अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागता येते. त्यांची सुनावणी घेऊन अंतिम आदेश देण्याचे काम जिल्हाधिकारी करतात.दरम्यान, सरकारने नुकताच निर्णय जाहीर केला आहे. जिल्ह्यात जमीनविषयक खटल्यांचे प्रमाण अधिक असल्याने आता बारामती येथेच अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## बंडखोराने दाखवला हात, मित्रानेही सोडली साथ

**भिवंडी :** भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या महापौरपदी भिवंडी सेक्युलर फ्रंटचे उमेदवार असलेले नारायण चौधरी विराजमान झाले आहेत. महापौरपदाची उमेदवारी न मिळाल्याने भारतीय जनता पक्षापासून फारकत घेत चौधरींनी भिवंडी सेक्युलर फ्रंटचा आधार घेतला होता. चौधरींच्या बंडखोरीमुळे भाजपचा भिवंडीत पुरता 'गेम' झाला आणि पक्षाचा अधिकृत उमेदवार थेट तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.भिवंडी महापौरपदाच्या निवडणुकीत ४८ मतं मिळवत भिवंडी सेक्युलर फ्रंटचे उमेदवार असलेले 'भाजप बंडखोर' नारायण चौधरी विजयी झाले. कोणार्क विकास आघाडीच्या विलास पाटील यांना २५, तर भाजपच्या स्नेहा पाटील यांना १६ मतं मिळाली आहेत.महायुतीत फूट पडल्यानंतर शिवसेना आणि भाजप दोघांकडून महापौर आणि उपमहापौरपदासाठी स्वतंत्र अर्ज दाखल करण्यात आले होते. तर महापौरपदाचे प्रबळ दावेदार मानले जाणारे भाजपचे नारायण चौधरी यांनी उमेदवारी न मिळाल्याने भिवंडी सेक्युलर फ्रंटसोबत जाण्याचा निर्णय घेत खळबळ उडवून दिली.

## छगन भुजबळ राज्यसभेवर जातील', अमोल कोल्हे यांचा गौप्यस्फोट

**पुणे :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या विलीनीकरणाचा विषय चर्चेत आला. विविध नेत्यांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया देण्यात आल्या. राष्ट्रवादीच्या दिग्गज नेत्यांनी या चर्चा फेटाळल्या. पण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी विलीनीकरणावर अजित पवार यांच्यासोबत चर्चा झाल्याचा दावा केला. पण आता त्या चर्चांना काही अर्थ नसल्याचंदेखील म्हटलं. खासदार अमोल कोल्हे यांनीदेखील अजित पवार यांच्यासोबत विलीनीकरणाबाबत १४ बैठका झाल्याचं म्हटलं होतं. पण त्या चर्चांना आता काय महत्त्व राहिलं? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता. दुसरीकडे मंत्री छगन भुजबळ यांनी विलीनीकरणासाठी घाई नको, असं वक्तव्य केलं आहे. यानंतर अमोल कोल्हे यांना छगन भुजबळ यांच्याबद्दल प्रश्न विचारला असता, कोल्हे यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे.आगामी काळात महाराष्ट्रातील



राज्यसभेच्या सात जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचं संख्याबळ पाहता मविआला केवळ एक जागा निवडून आणता येणार आहे. तर महायुतीचे ६ उमेदवार जिंकून येण्याची शक्यता आहे. याच निवडणुकीबाबत अमोल कोल्हे यांनी भाष्य करत मोठा गौप्यस्फोट केला आहे.छगन भुजबळ हे फार मोठे नेते आहेत आणि मी त्यांचा त्रागा समजू शकतो. कारण जी काही आधी चर्चा झाली होती, आता विशेषत: जातनिहाय जनगणना होत असताना, ओबीसीचा कॉलम जातनिहाय जनगणनेत नसताना, छगन भुजबळ यांच्यासारखे वरिष्ठ नेते संसंदेत असणं ही फार महत्त्वाची गोष्ट होती.

# तेव्हा माढाचा पाढा अन आता सुटेना तिढा; गणित कुठे अडकलं?

**मुंबई :** राज्यसभेच्या ३७ जागांसाठी मार्चमध्ये निवडणूक होत आहे. यातील ७ जागा महाराष्ट्रातील आहेत. शरद पवार यांच्यासह ६ जणांचा राज्यसभेचा कार्यकाळ येत्या २ एप्रिलला संपेल. त्यानंतर ते पुन्हा राज्यसभेवर जाणार का, याकडे राजकीय वतुर्ळाचं लक्ष लागलं आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे पुरेसं संख्याबळ नाही. पण अन्य पक्षांच्या मदतीनं ते राज्यसभेवर जाऊ शकतात. मात्र काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत तिढा निर्माण झाला आहे.राज्यसभेवर जाण्यासाठी ३७ मतांची गरज आहे. सध्या महाविकास आघाडीकडे एकूण ४६ मतं आहेत. यात शिवसेना उबाठाची २०, काँग्रेसची १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीची १० मतं आहेत. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा विषय चर्चेत आहे. याबद्दल शरद पवारांच्या पक्षानं भूमिका स्पष्ट करावी, अशी काँग्रेसची मागणी आहे. राष्ट्रवादी शपची भूमिका स्पष्ट झाल्यावर राज्यसभेवर चर्चा होईल, असा पवित्रा



काँग्रेसनं घेतला आहे. त्यामुळे पेच कायम आहे. मविआच्या भरवशावर निवडणूक लढवायची झाल्यास शरद पवारांसाठी काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरते. संसदीय राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत शरद पवारांनी २ वर्षांपूर्वी दिले. पण आता परिस्थिती बरीच बदलली आहे. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर परिस्थितीचा मोठा फरक पडला आहे. अशा परिस्थितीत शरद पवार पुन्हा एकदा राज्यसभेवर जाण्याचा विचार करु शकतात. शरद पवारांची इच्छा असेल तर त्यांच्यासाठी जिंकण्याचा विषय कठीण नाही. स्वत:च्या पक्षाचे १०, ठाकरेसेनेचे २० आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे असलेल्या अतिरिक्त मतांच्या जोरावरही ते राज्यसभा गाठू शकतात. अशा परिस्थितीत त्यांना काँग्रेसच्या मतांची गरज नसेल.शरद पवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरले तर निवडणूक बिनविरोध होईल. किंबहुना निवडणूक बिनविरोध होणार याची खात्री पटल्यावरच शरद पवार रिंगणात उतरतील. शरद पवार गेल्या ५९ वर्षांपासून संसदीय राजकारणात आहेत. विधिमंडळात २७ आणि संसदेत ३२ वर्षांपासून ते सक्रिय आहेत. या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. ते दोनदा राज्यसभेवर गेले आहेत. विशेष म्हणजे त्या दोन्ही वेळा राज्यसभेची निवडणूक बिनविरोध झालेली आहे. २०१४ आणि २०२० मध्ये शरद पवार राज्यसभेवर गेले. त्यावेळी निवडणूक बिनविरोध पार पडलेली होती.शरद पवारांनी राज्यसभा निवडणूक लढवायची ठरवली तर विजयाची खात्री असल्याशिवाय ते अर्ज भरणार नाहीत. २०१९ मध्ये शरद पवारांनी माढा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढायची तयारी केली होती. पण तिथल्या स्थानिक नेत्यांनी पवारांविरोधात फिल्डींग लावली. माढा शरद पवारांना पाडा, असा पवित्रा घेतला गेला. ही घोषणा पवारांच्या कानापर्यंत आली. त्यानंतर त्यांनी माढ्यातून लढण्यास नकार दिला. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुप्रिया सुळे बारामतीतून, तर पार्थ पवार मावळमधून लढत होते.

एकाच कुटुंबातून ३-३ उमेदवार नको, असं म्हणत पवारांनी माढ्यातून माघार घेतली. पण माढा शरद पवारांना पाडा ही घोषणा त्या माघारीमागे होती, अशी चर्चा त्यावेळी झाली. विजयाची खात्री असल्याशिवाय मैदानात उतरायचं नाही. उतरायचं ते जिंकण्यासाठीच, हा शरद पवारांचा मंत्र आहे. त्यामुळेच आता राज्यसभेच्या निवडणुकीत पवार काय करणार ते पाहणं महत्त्वाचं असेल.

# कॉपी' पकडली म्हणून संतापला, डॉक्टर विद्यार्थ्याचा राडा; वर्गातच प्राध्यापकाला मारहाण

**कर्नाटक :** परीक्षा ही प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची असते. याम धूनच त्या विद्यार्थ्याचं जीवन घडणार असतं. त्याचं अवघ भवितव्यचं परिक्षेवर अवलंबून असतं. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला आपण देत असलेली संबंधित परीक्षा ही निर्विघ्नपणे पार पडावी, कोणताही गोंधळ होऊ नये, कॉपी करण्यासारखा प्रकार तर कोणताही हुशार आणि प्रामाणिक विद्यार्थी तर अजिबात खपवून घेत नाही. परंतु व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात ते खरचं आहे. समाज हा चांगल्या आणि वाईट माणसांनी मिळून बनलेला आहे. असाच एक प्रत्यय आता कर्नाटकमध्ये पाहायला मिळाला आहे. कर्नाटकातल्या कलबुर्गी येथील एका होमि ओपॅथिक महाविद्यालयात परीक्षेदरम्यान प्रचंड गोंधळ झाल्याचं समोर आलं आहे.



परीक्षेत कॉपी करताना पकडले गेल्याच्या रागातून एका विद्यार्थ्याने चक्क पर्यवेक्षक असलेल्या प्राध्यापकालाच मारहाण केली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले असून, शैक्षणिक क्षेत्रातून संताप व्यक्त केला जात आहे.कलबुर्गी येथील डॉ मालकारेड्डी होमिओपॅथिक महाविद्यालयात ही घटना घडली आहे. अंतर्गत परीक्षा सुरु होती आणि सहाय्यक प्राध्यापक शिवराज कुमार हे परीक्षा हॉलमध्ये पर्यवेक्षक (इन्व्हेज्युलेटर) म्हणून कर्तव्य बजावत होते. यावेळी त्यांना शाहबाज नावाचा विद्यार्थी कॉपी करत असल्याचे आढळून आले. प्राध्यापकांनी त्याला सदर प्रकाराबाबत विचारले आणि त्याची उत्तरपत्रिका जप्त करून त्याला परीक्षा हॉलमधून बाहेर जाण्यास सांगितले. दरम्यान, प्राध्यापकांनी आपल्याला पकडले हे समजल्यावर विद्यार्थी प्रचंड संतापून गेला. त्याने थेट प्राध्यापकांशी बाचाबाची करत थेट त्यांना मारहाण केली आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये असे दिसत आहे की, उत्तरपत्रिका काढून घेतल्यामुळे विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये बाचाबाची सुरू झाली. काही क्षण शाब्दिक वाद झाल्यानंतर अचानक शाहबाजचा संयम सुटला. त्याने थेट प्राध्यापक शिवराज कुमार यांच्यावर धावून जात त्यांच्यावर बुक्क्यांनी प्रहार करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून वर्गातील इतर विद्यार्थी आपल्या जागेवरून उठले आणि त्यांनी मध्यस्थी करत शाहबाजला रोखण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, मारहाण करणारा हा विद्यार्थी मूळचा केरळचा असल्याची माहिती महाविद्यालयाने दिली आहे. या घटनेनंतर महाविद्यालयाने तातडीने त्याच्या पालकांना बोलावून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. महाविद्यालय प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, शाहबाजला संस्थेच्या पुढील सर्व परीक्षांना बसण्यास बंदी घातली आहे.

## अंगावर काळे कपडे, पिझ्झा अनब; रानात २५ वर्षीय तरुणीबरोबर काय घडलं?

**नाशिक :** नाशिक-मुंबई महामार्गालगत असलेल्या वाडीवरे पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २५ वर्षीय तरुणीची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सर्व शिवारातील एका निर्जन रानात या तरुणीचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आढळून आल्याने परिसरात दहशतीचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेमिळालेल्या माहितीनुसार, नाशिक-मुंबई महामार्गापासून जवळच असलेल्या एका निर्जन भागात आज सकाळी स्थानिकांना एक मृतदेह दिसून आला. नागरिकांनी तात्काळ या घटनेची माहिती वाडीवरे पोलिसांना दिली.

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, साधारण २५ वर्ष वयोगटातील एक तरुणी रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडलेली होती. प्रथमदर्शनी या तरुणीवर धारदार शस्त्राने वार करून तिची हत्या करण्यात आल्याचे दिसून येत आहे.पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असता, मयत तरुणीच्या मृतदेहाजवळ पिझ्झाचे बॉक्स आणि काही खाद्यपदार्थ आढळून आले आहेत. ही तरुणी कोणासोबत तरी येथे आली होती का? किंवा तिने जेवण मागवले होते का? या दिशेने आता पोलीस तपास करत आहेत. या तरुणीच्या अंगावर काळ्या रंगाचे कपडे असून, मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही. ही हत्या येथेच करण्यात आली की अन्यत्र हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह येथे आणून टाकला, याचा शोध पोलीस घेत आहेत.

नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी घटनास्थळाला भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या आहेत. त्यांनी सांगितले की, 'या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी वाडीवरे पोलिसांची विविध पथके तयार करण्यात आली आहेत. तांत्रिक पुरावे आणि घटनास्थळावरील वस्तूंवरून आरोपींचा शोध सुरू आहे.' तसेच, सदर वर्णनाची कोणतीही तरुणी बेपत्ता असल्यास नागरिकांनी तातडीने वाडीवरे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही नाशिक ग्राम ीण पोलिसांनी केले आहे.सध्या वाडीवरे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

## मुलीवर फॅमिली फ्रेण्डचा अत्याचार

**पुणे :** शाळेत सोडण्याच्या बहाण्याने अल्पवयीन मुलीला कारमध्ये बसवून निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना पुणे येथील वारजे माळवाडी परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध बलात्कार आणि बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा पीडितेच्या कुटुंबाच्या ओळखीतील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने १८ फेब्रुवारी रोजी सकाळी संबंधित अल्पवयीन मुलीला कारमधून शाळेत सोडतो, असे सांगून सोबत नेले. त्यानंतर कर्वेनगर भागातील डीपी रस्त्याजवळ कार थांबवून त्याने म ुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. हा प्रकार कोणाला सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही त्याने पीडितेला दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर घाबरलेल्या मुलीने आईकडे हा प्रकार सांगितला. त्यानंतर पीडितेच्या आईने वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## बसस्थानक परिसरातल्या लॉजवर छापा; मालकांचा काळा धंदा उघड

**जालना :** जालना बसस्थानक परिसरात वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दोन लॉजिंगवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी करत १३ महिला पीडितांची सुटका करून ७ पुरुष आरोपींना ताब्यात घेतले आहे. जालना बसस्थानक परिसरातील मोक्ष लॉज आणि वैष्णवी लॉजचे मालक हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांच्या लॉजमध्ये बाहेरून महिलांना आणून त्यांच्याकडून अनैतिक देहव्यापार करून घेत असल्याची माहिती मिळताच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने मोक्ष लॉजवर छापा मारला.लॉजचे मालक सचिन नंदू पवार (वय ३०, रा. वाटूर, ता. परतूर, जिल्हा- जालना), मॅनेजर संतोष भोलेनाथ जाधव (रा. खरपुडी, ता. जि. जालना) यांच्यामार्फत वैष्णवी लॉजचे मॅनेजर कैलास रतन कुमार (वय ३०, रा. सावा, ता. जि. चित्तोडगड, राज्य राजस्थान, ह.मु. वैष्णवी लॉज, जालना) हे स्वतःच्या फायद्यासाठी बाहेरून महिलांना बोलावून वेश्या व्यवसाय चालवत असताना छापा म ारण्यात आला. यामध्ये पंकज भाऊसाहेब



निकाळजे (वय २५ वर्ष, रा. जांमवाडी, ता. जि. जालना), तुषार हरिश बत्रा (वय २४ वर्ष, रा. परतूर), रोहित संजय बोर्डे (वय २६ वर्ष, रा. जांमवाडी, ता. जि. जालना), करण रवी वाहुळे (वय २० वर्ष, रा. जामवाडी, ता. जि. जालना) यांच्यासह पश्चिम बंगाल राज्यातील ६, आसाम राज्यातील ३ व छ. संभाजीनगर येथील ४ अशा एकूण १३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांच्या ताब्यात ८१ हजार ७५० रुपये एवढा मुद्देमाल, रोख रक्कम व साहित्य मिळून आले आहेपुरुष आरोपींसह १३ महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सदर बाजार येथे स्त्रियांचा व मुलींचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# आता तुला सोडत नाही'; वृद्धाला चौकात मारहाण केली, व्हिडिओ काढला

**बीड :** शहरातील सहयोग नगर परिसरात सर्वेश्वर मंदिराजवळ भरदिवसा झालेल्या मारहाणीच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात प्रमुख आरोपीला बीड शहर पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दिनांक १५ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता एका अज्ञात व्यक्तीने मोबाईलवरून बीड शहर पोलीस ठाण्यास माहिती दिली की, सर्वेश्वर मंदिराजवळ चार महिला व एका पुरुषाने एका व्यक्तीस बेदम मारहाण केली आहे. माहिती मिळताच झडख संदीप नेवरे व झडख महेश जाधव हे पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.तपासात




समोर आले की, सदाशिव धोंडिबा कोकाट (रा. पांडुरंग नगर, बहिरवाडी, बीड) हे आपल्या मुलासोबत सामान्य रुग्णालयाकडे जात असताना दोन महिला आरोपींनी त्यांना अडवून मोटारसायकलची चावी काढून घेतली. वयोवृद्ध असल्याने पुढे जाऊ देण्यास विरोध करण्यात आला. त्यानंतर संबंधित महिलांनी प्रमुख आरोपीला घटनास्थळी बोलावून घेतले. सर्व आरोपींनी मिळून भर रस्त्यात कोकाट यांना मारहाण केली. त्यांच्या डोक्यावर बोथट वस्तूने वार करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण उपलब्ध झाल्याने गुन्हा नोंदविणे व पुरावे गोळा करण्यास पोलिसांना मदत झाली. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वीही याच पीडितावर गंभीर हल्ला झाल्याची नोंद असून त्या प्रकरणी भारतीय दंड विधान कलम ३२६ अन्वये गुन्हा दाखल आहे. सलग दोन दिवस सार्वजनिक ठिकाणी गंभीर स्वरूपाची मारहाण झाल्याने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून भारतीय दंड विधान कलम ३०७ (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणातील प्रमुख आरोपी विकी उर्फ पवन किशोर वीर (रा. नवनाथ नगर, चखऊ, बीड) यास ४८ तासांच्या आत अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मंजूर केली आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षी व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत.

## सलग दोन वर्ल्डकप जिंकणारा पहिला संघ

# टीम इंडिया पुन्हा एकदा 'चॅम्पियन'






## फायनलमध्ये न्यूझीलंडचा उडवला धुव्वा

**अहमदाबाद (वृत्तसंस्था) :** न्यूझीलंड समोर २५६ धावांचा डोंगर उभा केल्यानंतर भारतीय गोलंदाजांनीही कमाल करताना किवी संघाचा पराभव केला. जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांच्या घातक माऱ्यासमोर न्यूझीलंडचा डाव १५९ धावांवरच आटोपला आणि भारताने ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक पटकावला. हा केवळ विजय नव्हता, तर भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा अभिमानाचा क्षण होता.

टीम इंडियाने विजयासाठी दिलेल्या २५६ धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या न्यूझीलंडची सुरुवात मात्र अत्यंत खराब झाली. भारताचे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि फिरकीपटू अक्षर पटेल यांनी अचूक आणि घातक गोलंदाजी करत किवी फलंदाजांना बांधून ठेवले. नियमित अंतराने विकेट्स घेत भारताने साम न्यावर पकड मजबूत केली. दबावाखाली खेळणाऱ्या न्यूझीलंडच्या फलंदाजांना मोठी भागीदारी करता आली नाही. परिणामी संपूर्ण संघ १५९ धावांवर मर्यादित राहिला आणि भारताने हा सामना ९६ धावांनी जिंकला. सेफर्टने सर्वाधिक ५२ धावांची खेळी साकारली. याशिवाय, डॅरिल मिचेलने १७ तर मिचेल सँटनरने ४३ धावा फटकावल्या.

### टीम इंडियाचा दणकेबाज विजय

प्रारंभी, न्यूझीलंडविरुद्ध अंतिम सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाच्या डावाची सुरुवात संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी केली. दोन्ही खेळाडूंनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांची जबरदस्त धुलाई केली. भारताने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील पॉवरप्लेमध्ये सर्वोच्च ९२ धावांचा स्कोअर केला. अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांच्यात पहिल्या विकेटसाठी ९८ धावांची भागीदारी झाली. यादरम्यान, अभिषेकने शानदार अर्धशतकी खेळी साकारली. पण, अर्धशतकानंतर तो लगेचच बाद झाला.

### संजू, इशानचा धमाका

अभिषेक २१ चेंडूत ५२ धावांची खेळी करून परतल्यावर इशान किशनचा धमाका पाहायला मिळाला. संजूच्या साथीने त्याने दुसऱ्या विकेटसाठी ४८ चेंडूत १०५ धावांची भागीदारी रचली. संजू सॅमसनने ४६ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकाराच्या मदतीने ८९ धावांची खेळी साकारली. याशिवाय इशान किशनने २५ चेंडूत ५४ धावांचे योगदान दिले. त्याच्या बॅटमधून ४ चौकार आणि ४ षटकार पाहायला मिळाले. टी-२० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये आघाडीच्या तिन्ही फलंदाजांनी अर्धशतक झळकावण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

भारतीय संघाने १५ व्या षटकातच धावफलकावर २०३ धावा लावल्या होत्या. पण एकाच षटकात संजू सॅमसन, इशान किशन आणि सूर्यकुमार यादव यांची विकेट पडल्यावर भारतीय संघ २५० धावांपर्यंत मजल मारणार नाही, असे चित्र निर्माण झाले होते. पण अखेरच्या षटकात शिवम दुबेचा पॉवर हिटिंग शो पाहायला मिळाला. त्याने ८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २६ धावांचे योगदान देत भारतीय संघाच्या धावफलकावर २० षटकात ५ बाद २५५ धावा करत न्यूझीलंड समोर विक्रमी धावसंख्या उभारली. संजू आणि अभिषेकने फायनलमध्ये किवीज गोलंदाजांची तुफानी धुलाई करताना पॉवरप्लेमध्ये ९२ धावा केल्या.

ही वर्ल्ड कप स्पर्धेतील पॉवर प्लेमधील सर्वोच्च धावसंख्या ठरली. याआधी वेस्ट इंडिजने २०२४ मध्ये अफगाणिस्तानविरूद्ध ९२ धावा केल्या होत्या. पण तेव्हा संघाने १ विकेट गमावली होती.

### संजू सॅमसनची अर्धशतकांची हॅट्रिक



■ आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत संजू सॅमसनच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. सुरूवातीच्या काही सामन्यांमध्ये त्याला खेळण्याची संधी मिळाली नव्हती. पण एकदा संधी मिळाल्यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही. गेल्या तिन्ही सामन्यांमध्ये त्याने लागोपाठ ३ अर्धशतके झळकावण्याचा पराक्रम केला. यासह सॅमसनने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत अर्धशतकांची हॅट्रिक केली आहे. याआधी १ मार्चला कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या साम न्यात संजूने ५० चेंडूत नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. तर मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात संजूने ४२ चेंडूत ८९ धावांची खेळी केली होती. आता न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात संजूकडे शतक झळकावण्याची संधी होती. पण ८९ धावांवर तो बाद झाला. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत अर्धशतकांची हॅट्रिक करणारा तो दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. भारताचा केएल राहुल या यादीत अव्वल स्थानी आहे. केएल राहुलने २०२२ मध्ये झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत लागोपाठ ३ अर्धशतके झळकावली होती.

### वर्ल्डकपमध्ये अभिषेक शर्माचे वेगवान अर्धशतक



■ फायनलमध्ये अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. यासह आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत सर्वात जलद अर्धशतकी खेळी करणारा फलंदाज ठरला आहे. याआधी हा विक्रम जेकब बेथेल आणि फिन ॲलेनच्या नावावर होता. दोघांनी १९ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले होते.

## ऑस्ट्रेलियन ग्रां प्रिमध्ये रसेल विजेता

**मेलबर्न :** येथे झालेल्या या मोसमातील पहिल्या फॉर्म्युला वन शर्यतीत मर्सिडीजच्या जॉर्ज रसेलने ऑस्ट्रेलियन ग्रां प्रि चे जेतेपदे पटकावले. त्याचाच संघसहकारी किमी अँटोनेलीने दुसरे व फेरारीच्या चार्लस लेक्लर्कने तिसरे स्थान मिळिवले.



पात्रता शर्यतीत वर्चस्व गाजविल्यानंतर पोल पोझिशनवर असणाऱ्या रसेलने अल्बर्ट पार्कवरील पहिले जेतेपद मिळिवले. मर्सिडीजने प्रारंभापासूनच आपला फॉर्म दाखवून दिला आहे. रसेल व लेक्लर्क यांच्यात सुरुवातीला जोरदार चुरस लागली होती. पहिल्या सात लॅप्समध्ये दोघेही आलटून पालटून एकमेकांवर आघाडी घेत होते. मॅक्लारेनला मात्र ही शर्यत कठीण गेली. त्यांच्या ऑस्कर पियास्ट्रीला शर्यत सुरू होण्याच्या ४० मिनिटे आधी त्याची कार क्रॅश झाल्याने शर्यतीबाहेर पडावे लागले. त्याचा सहकारी व विद्यमान विजेता लँडो नोरिसने पाचवे, फेरारीच्या लेविस हॅमिल्टनने चौथे, चार वेळचा विजेता रेड बुलच्या मॅक्स व्हर्स्टापेनने सहावे, हासच्या ऑलिव्हर बिअरमनने सातवे, रेसिंग बुल्सच्या ऑर्विड लिंडब्लाडने आठवे, ऑडीच्या गॅब्रियल बोर्टोलेटोने नववे व अल्पाईच्या पीयर गॅसलीने दहावे स्थान मिळिवले.

## न्यूझीलंडचा झिंबाब्वेवर ८ गड्यांनी विजय

**ड्युनेडीन (न्यूझीलंड) :** रविवारी येथे खेळिवण्यात आलेल्या महिलांच्या दुसऱ्या वनडे सामन्यात ॲमेलिया केरच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर यजमान न्यूझीलंड महिला संघाने झिंबाब्वेचा ८ गड्यांनी दणदणीत पराभव केला. न्यूझीलंडची कर्णधार ॲमेलिया केरने ३४ धावांत ७ बळी मिळवून ४४ वर्षांचा विक्रम मोडीत काढला. न्यूझीलंडने या मालिकेत झिंबाब्वेवर २-० अशी विजयी आघाडी मिळवली आहे.



उभय संघातील ही मालिका ३ सामन्यांची खेळवली जात आहे. या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफक जिंकून झिंबाब्वेला प्रथम फलंदाजी दिली. ॲमेलिया केरच्या शिस्तबद्ध आणि अचूक गोलंदाजीसमोर झिंबाब्वेचा डाव २९.१ षटकात अवघ्या १०२ धावांत आटोपला. त्यानंतर न्यूझीलंडने १६.२ षटकात २ बाद १०६ धावा जमवित सहज विजय नोंदविला.

झिंबाब्वेच्या डावात सलामीच्या मुपाचिकवाने ५१ चेंडूत ४ चौकारांसह ३२, निधलोवुने २ चौकारांसह १२, माझविशायाने २ चौकारांसह १३ आणि मकुशाने २ चौकारांसह १२ धावा जमविल्या. झिंबाब्वे संघातील ४ फलंदाजांना खातेही उघडता आले नाही. झिंबाब्वेचा निम्मा संघा १९.१ षटकात ६९ धावांत तंबूत परतला होता. न्यूझीलंडतर्फे ॲमेलिया केरने ३४ धावांत ७ तर पेनफोल्डने १७ धावांत ३ गडी बाद केले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना न्यूझीलंडच्या डावात सलामीची फलंदाज आणि कर्णधार ॲमेलिया केरने १ षटकार आणि ६ चौकारांसह ४० चेंडूत ४५ धावा तर इसाबेला गेझने २२ चेंडूत ४ चौकारांसह २० धावा जमविल्या. मॅडी ग्रीनने २९ चेंडूत ४ चौकारांसह नाबाद २७ तर हॅलिडेने ७ चेंडूत १ चौकारासह नाबाद ७ धावा केल्या. केर आणि गेझ यांनी सलामीच्या गड्यासाठी ३४ धावांची भागिदारी केली. गेझ बाद झाल्यानंतर केरने ग्रीनसमवेत दुसऱ्या गड्यासाठी ४९ धावांची भर घातली. झिंबाब्वेतर्फे चॅटोन्झ्वा आणि माझ्वीशाया यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अभिनेत्री रेवती लेले अडकली विवाह बंधनात; नवऱ्याचे कला क्षेत्राशी आहे कनेक्शन



**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्री नुकतीच लग्न बंधनात अडकली आहे. तिच्या लग्न सोहळ्याचे खास फोटो समोर आले आहेत. गेले काही दिवसांपासून रेवती लेलेच्या घरी लगीन घाई पाहायला मिळत आहे. तिने सोशल मीडियावर ग्रहमख समारंभ, मेहंदी कार्यक्रमाचे फोटो शेअर केले होते. रेवतीने प्रेमाची कबुली दिल्या पासून तिचा जोडीदार कोण आहे, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागली होती. रेवतीने देखील खूप वेळापासून तिच्या नवऱ्याचा चेहरा लपवला होता. मात्र आता रेवतीचा नवरा कोण? हे समोर आले आहे.

रेवती लेलेने कौशिक भिडेसोबत लग्नगाठ बांधली आहे. कौशिक भिडे हा अभिनेता नसून तो कला क्षेत्राशी संबंधित काम करतो. दोघांनी लग्न सोहळ्यासाठी पारंपरिक लूक केला होता. दोघे एकत्र खूपच छान दिसत होते. रेवतीने सुंदर पिवळ्या रंगाची साडी नेसली होती, ज्याला हिरवा काठ होता. केसांचा बन, मराठमोळा साज श्रृंगार, हातात हिरवा चुडा, नाकात नथ, कपाळावर मुंडावळ्या बांधल्या होत्या. नवराईच्या रुपात रेवतीचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. तर कौशिकने लाल आणि पांढऱ्या रंगाचा पारंपरिक पोषाख परिधान केला होता. दोघे एकत्र खूपच आनंदी दिसत होते. रेवती लेलेने सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंवर चाहते, कलाकार कमेंट्सचा वर्षाव करत आहे. दोघांनी नवीन आयुष्यासाठी, लग्नासाठी शुभेच्छा देत आहेत. फोटोंवर हृता दुगुर्ळे, समृद्धी केळकर, विशाल निकम अशा अनेक कलाकारांनी शुभेच्छा दिल्या आहेत. रेवतीचे चाहते आता रेवती आणि कौशिकची लव्ह स्टोरी जाणून घेण्यासाठी उत्सुक आहेत.

रेवतीने अनेक हिंदी आणि मराठी मालिकांमध्ये काम केले आहे. तिच्या अभिनयाचे चाहते दिवाने आहेत. 'स्वामिनी', 'लग्नाची बेडी' , 'कोण होतीस तू, काय झालीस तू' या मराठी मालिकांमध्ये ती झळकली. कौशिक भिडे डिझायनिंग क्षेत्रात काम करतो. तसेच तो सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो. तो ट्रॅव्हलिंगचे अनेक फोटो आणि व्हिडीओ शेअर करतो. त्याचा डिस्को नावाचा ब्रँड देखील आहे.

## ऑनलाइन भरणार शाळा; क्रांतिज्योती विद्यालय सिनेमा ओटीटीवर येणार

**मुंबई :** सध्या सर्वत्र मराठी भाषेचा डंका पाहायला मिळत आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपट तुफान गाजत आहे. आता चित्रपट रिलीज होऊन दोन महिने झाले आहेत. 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपट १ जानेवारी २०२६ला प्रदर्शित झाला. चित्रपटात मराठी शाळा आणि मराठी भाषेबद्दलचे मत, विचार मांडले आहेत. ज्यामुळे चित्रपटाने महाराष्ट्रातील प्रेक्षकांचे भरपूर प्रेम मिळवले आहे. आता 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपट ओटीटीवर पाहायला मिळणार आहे. नुकतीच सोशल मिडिया पोस्ट समोर आली आहे. ज्यात चित्रपटाचे ओटीटी अपडेट समोर आले आहेत.

'क्रांतिज्योती विद्यालय - मराठी माध्यम' चित्रपट नएए ५ या ओटीटी प्लॅटफफॉर्मवर रिलीज होणार आहे. चित्रपटाचे ऑनलाइन स्ट्रीमिंग राइट्स नएए ५ ने विकत घेतले आहेत. आता तुम्ही घरबसल्या शाळेच्या आठवणी ताज्या करू शकता. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त चित्रपट ओटीटीवर रिलीज होणार आहे. 'क्रांतिज्योती विद्यालय - मराठी माध्यम' चित्रपट २७ फ्रेबुवारीला ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्माते हेमंत ढोमे आणि क्षिती जोग यांनी केले आहे. लवकरच 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम'चा दुसरा भाग देखील प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची घोषणा हेमंत आणि क्षितीने केली.

## तू इथे पदर पकडायला आला नाहीस!' राखीच्या नव्या चालीमुळे तन्वी-प्रभूमध्ये वादाची ठिणगी?



**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६' या लोकप्रिय रिॲलिटी शोच्या नव्या प्रोमोमध्ये घरातील संबंध, रणनीती आणि तणावाचे वातावरण वाढले आहे. सोशल मीडियावर शेअर झालेल्या प्रोमोमध्ये तन्वी कोलते आणि प्रभू शेळके यांच्यातील मतभेद होत असल्याचे दिसते. या दोघांची मैत्री सुरुवातीला मजबूत असली तरी आता राखी सावंतमुळे दोघांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडण होणार असल्याचं नवीन प्रोमोमध्ये दिसते.

प्रोमोमध्ये दाखवलं आहे, किचनच्या परिसरात स्पर्धकांचा गोंधळ सुरु असल्याचे दिसते. राखी सावंत प्रभूला बोलते 'तू इथे पदर पकडायला आला नाहीस तू खेळात आणखी जबाबदारी घे स्मार्टनेस दाखव. त्यावर तन्वी 'ही काहीही बोलते' असे म्हणत राखीचा विरोध करते. त्यानंतर प्रभूला वाईट वाटत म्हणून राखीत्याला मिठी मारते आणि प्रभूला रडू येत. यानंतर तन्वी स्पष्टपणे प्रभूला सांगते, 'उद्यापासून माझा पदर पकडू नकोस'. प्रभू यानंतर रडताना आणि उदास झालेला दिसतो. राखी सावंत त्यानंतर म्हणते की 'त्याने तन्वीला कॅप्टन बनवलं आहे आणि त्याचा काही स्पर्धक आता स्वत:साठी वापर करत आहेत.' प्रोमोच्या शेवटी प्रभू आणि तन्वी यांच्यातील मतभेद अधिक वाढल्याचे दिसून येते. सोशल मीडियावर या प्रोमोला प्रचंड प्रतिसाद मिळत असून, नेटिझन्स राखीच्या रणनीती आणि घरातील सदस्यांचे बदलते नाते यावर भरभरून कमेंट्स करत आहेत. एका नेटकऱ्याने कमेंट केली, 'राखी प्रत्येकाचे डोळे उघडत आहे.' आणखी एकाने लिहिले, 'राखी काट्यात राहून काट्यांचा काटा काढते', तर एकाने लिहीलं,'राखी टोळीला नडत होती' आता येत्या भागात वाद का झाला आणि राखीचं जबाबदार आहे का हे समजेल.

## जॅकी श्रॉफने केलं होतं तब्बूसोबत गैरवर्तन?



**मुंबई :** जॅकी श्रॉफ हे बॉलिवूडमधील लोकप्रिय कलाकारांपैकी एक आहेत. जॅकी श्रॉफ यांचं नाव फक्त त्यांच्या कामामुळेच नाही तर त्यासोबतच त्यांच्या खासगी आयुष्यामुळेही तितकेच चर्चेत होते. जॅकी श्रॉफ एकदा एका मोठ्या कॉन्ट्रोव्हर्सीमुळे चर्चेत आले होते. ही कॉन्ट्रोव्हर्सी अभिनेत्री तब्बू संबंधीत आहे. त्या दोघांमध्ये झालेल्या एका घटनेमुळे त्या दोघांनी कधी एकत्र काम केलं नाही. तब्बूचं करिअर सुरु होण्याआधी ती तिची बहीण फराह नाजसोबत दिसली होती. या पार्टीत जॅकी श्रॉफ हे देखील उपस्थित होते. या पार्टीत काही असं झालं की तब्बूनं चित्रपटसृष्टीत पदार्पण केल्यानंतरही त्यांनी एकत्र काम केलं नाही. १९८६ मध्ये ही पार्टी झाली होती आणि ही पार्टी डॅनीच्या घरी होती. या दरम्यान, तब्बूची बहीण फराह नाज आणि जॅकी श्रॉफ दिलजले या चित्रपटात एकत्र काम करत होते. तर चित्रपटाची टीम ही अनेकदा डॅनी यांच्या घरी पार्टी करायचे. अशीच एका पार्टीत फराह नाज तब्बूला घेऊन गेली होती. या पार्टीला खास बनवण्यासाठी जेवणापासून ड्रिंक्स पर्यंत सगळ्या गोष्टींची योजना करण्यात आली होती. सगळ्यांनी आपल्या आपल्या सवयीनुसार, ड्रिंक्स घेतले आणि खूप काही खाल्लं. मात्र, रिपोर्ट्सनुसार, जॅकी श्रॉफ यांनी खूप जास्त दारू पिली होती. त्यानंतर तब्बूसोबत असं काही केलं की फराह नाज संतापली होती. पार्टीत जॅकी श्रॉफ यांनी इतकं मद्यपान केलं होतं की जॅकी श्रॉफ खूप अनियंत्रीत झाला. त्यावेळी त्याला फराहची बहिणी म्हणजेच तब्बू दिसली जॅकी जवळजाण्याचा प्रयत्न करत होते. जॅकी तिली किस करणार इतक्यातच डॅनी यांनी पाहिलं, तेव्हा ते त्यांच्या जवळ गेले आणि जॅकीला थांबवण्याचा प्रयत्न केला.



त्यानंतर तब्बूपासून जॅकीला डॅनी यांनी लांब नेले. मात्र, हे सगळं पाहिल्यानंतर फराह नाज नाराज झाली. त्यावेळी मीडियामध्ये या सगळ्या गोष्टींवर वाद सुरु केला. त्यानंतर हा गैरसमज असल्याचे सांगत त्यांनी सगळ्यांना शांत होण्यास सांगितले होते. मात्र, या पार्टीनंतर तब्बू आणि जॅकी श्रॉफ यांनी कधीच एकत्र काम केलं नाही. जॅकी श्रॉफ आणि तब्बू याबाबत कधीच उघडपणे बोलले नाहीत. मात्र या गोष्टीची चर्चा बराच काळ चालली होती.

# एकल महिलांच्या मुलांना स्वीकारून लग्न करण्याची तयारी ठेवा, तुमचे लग्न सहज होतील...

## लग्नाळू तरुणांना प्रा. लहाने यांचे आवाहन!

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रत्येक गावामध्ये तरुण मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाही, लग्नाळू तरुणांनी एकल महिलांच्या मुलांना स्वीकारून त्यांच्यासोबत लग्न करण्याची मानसिकता ठेवावी व आयुष्याला जोडीदार मिळवून सुखी जीवन घालवावे असे आवाहन मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने यांनी केले आहे. महाराष्ट्र मराठा सोयरीक संभाजीनगर व मानस फाउंडेशनच्या वतीने आयोजित मराठा समाज व एकल, महिलांचा परिचय मेळावा पानवडोद खुर्द ता. सिल्लोड,जिल्हा संभाजी नगर येथे महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आज पार पडला यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष कावळे पाटील होते. उद्घाटक म्हणून मराठा सोयरिक चे अध्यक्ष पोपटराव सातपुते, विजय दौंड, प्रकाश गाडेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. परिचय मेळाव्यास मोठ्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये तरुण-तरुणी यांच्यासह पालकही उपस्थित झाले.विधवा, विधुर ,घटस्फोटीत यांचा समावेशही दखलपात्र होता. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना प्रा.डी एस लहाने म्हणाले, एखाद्या महिलेवर दुःखाचा डोंगर कोसळतो, जेव्हा तिचा आयुष्याचा जोडीदार सोडून जातो, यामध्ये तिला दोषी धरणे योग्य नाही. अतिशय कमी वयामध्ये बऱ्याचशा मुली विधवा होतात. दुसरीकडे तरुणांना लग्नासाठी मुली मिळत हे चित्र सर्वत्र आहे.दोघेही अडचणीत आहे. गावा गावांमध्ये अनेक तरुण बिना लग्नाचे आहे. अनेकांची वय देखील बरेचसे झाले आहे. अशा वेळी काळाची पावले ओळखून लग्नाळू तरुणांनी विधवा, घटस्फोटीत महिलांशी लग्न करण्याचा विचार केल्यास दोघांनाही जोडीदार मिळू शकतो व जीवन सुखी जगता येऊ शकते.यात गैर काहीही नाही. हीच सामाजिक मानसिकता तयार करण्याचे काम मानस फाउंडेशन करीत असल्याचे ते म्हणाले. संतोष दौंड, गजानन दौंड तात्यासाहेब गावंडे यांनी भूमिका विशद केली. पानवडोद खुर्द, पानवडोद बुद्रुक ग्रामपंचायत,सर्व सदस्य व ग्रामस्थांनी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला. आयोजक विजय अंभोरे व पोपटराव सपकाळ पाटील यांनी आयोजनाची भूमिका मांडली.असे मेळावे प्रत्येक जिल्ह्यामध्ये झाले पाहिजे, जेणेकरून लग्न जुळवणे ही अति अवघड झालेली समस्या सोडवण्यास मदत होईल असे ते म्हणाले.


# प्रभात मित्र मंडळात ८ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा!

**वृत्तसंस्था/मुंबई**



विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात ८ मार्च चा जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विभागातील शैक्षणिक ,सामाजिक , राजकीय,क्रीडाविषयक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड होते.प्रमुख पाहुण्या म्हणून दैनिक द ग्लोबल टाईम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर तर विशेष अतिथी म्हणून नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव होत्या.नगरसेविका जाधव यांची मुंबई महानगर पालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह शाल,व गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.शीतल हरीष करदेकर यांना सन्मानचिन्ह,शाल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी केले. ङ्घमहिला दिन हा रोजचाच, महिलांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी दिलेला वैश्विक लढा महत्त्वाचा, पण केवळ स्त्रीमुक्तीपेक्षा ,दोघांच्या साथीने संसार होतो. गुणवंत स्त्रीचा सत्कार करताना तिच्या पाठीशी ,सोबत असणाऱ्या जोडीदाराचाही सत्कार होणे आवश्यक!ङ्घ असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या द ग्लोबल टाइम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर यांनी केले. ङ्घसमाजात विकृती वाढतेय, तांत्रिक प्रगती होतेय, हातातल्या फोनवर आपला मुलगामुलगी काय करते याकडे आई - वडिलांचं लक्ष असायलाच हवं. धर्मवादात न अडकता आपल्या मुलांना समाजात योग्य वावरण्याची कला शिकवणे ही मोठी जबाबदारी आहे. स्त्रीबिजाच्या माफियागिरीपर्यंत निर्लज्ज विकृत लोक पोहोचलेत आणि म्हणूनच मुलींना जगण्याची कला नी सावधानता कळणे ही आजची गरज आहे. म्हणून पालकांची जबाबदारी मोठी आहे. ङ्घ याविषयी सविस्तर बोलून ङ्घमराठी भाषा ,मराठीपण टिकवायचं तर मराठीतून व्यक्त होणं, साहित्य, ग्रंथालये मजबूत करणं ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.ङ्घ असेही करदेकर यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ अनघा विनय राऊत,डॉ.मनीषा प्रनिल नायर, डॉ. रश्मी जीवन जाधव,डॉ.मंगला सुनिल जाधव,ॲडव्होकेट ज्योती दुराफे ,केतकी अरविंद सांगळे,अहिल्या सोपान थोरवे,प्रज्ञा गितेश कदम,खेळाडू साक्षी गितेश कदम,आसावरी प्रमोद भोईटे,अनुराधा अनिल कल्याणकर,गायिका स्वप्ना मुरलीधर रोकडे,स्नेहल दिलिप कांबळे,वृंदा वाघमारे,ॲडव्होकेट गाथा ढाले,श्रध्दा सुभाष रुके,सुनिता अंकुश वीर,पत्रकार सहिष्णुता शरद कांबळे,पत्रकार नयन नासिकेत पानसरे आदिंना सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड व ॲडव्होकेट ज्योती दुराफे यांची भाषणे झाली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत यांनी केले होते.आभार मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,खजिनदार गौतम नि.डांगळे,उपसचिव श्रध्दानंद निकम,सदस्य भूमय्या सोमा,बबन माने,पोपट साठे,विलास देशनेहरे,संजय मयेकर आदिंनी मेहनत घेतली होती.



# आरोग्य जनजागृतीसाठी तरुण डॉक्टर मैदानात डॉ. तुषार गोंधणे यांचा बुलढाणा जिल्ह्यात सामाजिक पुढाकार



**जनसंचलन/ चिखली**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तसेच रासायनिक उत्पादने, प्रदूषण आणि अयोग्य औषधांच्या वापरामुळे त्वचा व केसांच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. अनेक नागरिक योग्य माहितीअभावी चुकीच्या उपचारांच्या जाळ्यात अडकत असल्याचेही चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर चिखली येथील तरुण त्वचारोग तज्ज्ञ डॉ. तुषार गोंधणे यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत नागरिकांच्या आरोग्य जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. डॉ. गोंधणे हे केवळ चिखलीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांमध्ये त्वचा व केसांच्या आजारांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. नागरिकांना योग्य आरोग्य माहिती मिळावी, चुकीच्या औषधोपचारांपासून लोकांनी दूर राहावे आणि योग्य वेळी योग्य उपचार मिळावेत यासाठी ते विविध माध्यमांतून मार्गदर्शन करत आहेत. याचबरोबर गोरगरीब व सर्वसामान्य जनतेपर्यंत परवडणारी आणि योग्य आरोग्य सेवा पोहोचवणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांची सेवा करण्याच्या हेतूने त्यांना योग्य वैद्यकीय सल्ला व उपचार मिळावेत यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. भविष्यात बुलढाणा जिल्ह्यातील विविध भागांत आरोग्य जनजागृती कार्यक्रम, आरोग्य शिबिरे आणि मार्गदर्शन उपक्रम राबवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याचा त्यांचा मानस आहे. ङ्खआरोग्य हीच खरी संपत्ती आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत योग्य आरोग्य सेवा पोहोचणे ही डॉक्टर म्हणून आपली सामाजिक जबाबदारी आहे,ढ्ढ असे मत डॉ. तुषार गोंधणे यांनी व्यक्त केले. डॉ. तुषार गोंधणे यांच्या या सामाजिक पुढाकाराचे चिखलीसह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात स्वागत होत असून त्यांच्या या उपक्रमामुळे समाजात आरोग्याबाबत सकारात्मक जनजागृती होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जुन्या वादातून तरुणास मारहाण



**जनसंचलन/ शेगाव**

जुन्या वादातून झालेल्या किरकोळ भांडणातून एका तरुणास मारहाण केल्याची घटना ७ मार्च रोजी दुपारी सुमारे २ वाजता येथील जुने बसस्थानक परिसरात घडली. या प्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेख मोहम्मद शेख हुसैन (२५, रा. इदगाह प्लॉट, शेगाव) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, आरोपी शेख जावेद शेख युनूस (रा. पेठ मोहल्ला, शेगाव) याने जुन्या वादाच्या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ केली व धमकी दिली. त्यानंतर आरोपीने सिमेंटचा तुकड्याने हल्ला केला. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

# कर्जाची रक्कम काढून घेऊन २०.८६ लाखांची फसवणूक



**जनसंचलन/ नांदुरा**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळातून मंजूर झालेले कर्ज बँक खात्यात जमा झाल्यानंतर ती रक्कम काढून घेऊन दुसऱ्या ठिकाणी देण्याचे सांगून सात जणांची एकूण २० लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध ७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना चांदुरबिस्वा ता. नांदुरा येथे उघडकीस आली. याबाबत मोहम्मद लतीफ मोहम्मद हनिफ (४५, रा. चांदुरबिस्वा ता. नांदुरा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून अफरोज खान दिलावर खान (रा. चांदुरबिस्वा ता. नांदुरा) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादी व इतर सहा जणांचे बँक खात्यात रक्कम जमा झाल्यानंतर ती काढून दुसऱ्या ठिकाणी देण्याबाबत सांगितले मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्रत्येकी २ लाख ९८ हजार रुपयांचे कर्ज मंजूर करून घेतले. कर्जाची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर ती रक्कम खात्यातून काढण्यास भाग पाडले. नंतर ही रक्कम चांदुरबिस्वा येथे अधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात येईल असे सांगून आरोपीने फिर्यादी व इतर सहा जणांकडून प्रत्येकी २ लाख ९८ हजार रुपये असे एकूण २० लाख ८६ हजार रुपये घेतले आणि त्यानंतर फरार झाला. हा प्रकार ४ जानेवारी २०२४ ते २८ जून २०२४ दरम्यान घडला असून, ७ मार्च २०२६ रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**मा.श्री.डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, बुलढाणा


**मा.ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस**
महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री


**मा.श्री.गुलाबराव खरात** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा

## महाराष्ट्रात बुलढाणा जिल्हा अव्वल - अभिमानास्पद कामगिरी !

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय Nominal GDDP Growth ( 2024-25 vs 2023-24 ) आकडेवारीनुसार २२.६% आर्थिक वाढीसह बुलढाणा जिल्ह्याने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे, ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. या उल्लेखनीय यशामागे आदरणीय जिल्हाधिकारी महोदय मा.डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), मा. श्री. गुलाबराव खरात (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. बुलडाणा, मा. श्री. प्रमोद लांडे, उपसंचालक, जिल्हा औद्योगिक केंद्र, बुलडाणा, मा. श्री. संतोष डाबरे, जिल्हा कृषी अधिक्षक, बुलडाणा, मा. श्री. के. के. सिंग, Lead District Manager (LDM) दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, अचूक Micro Planning आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख कारण ठरले आहे. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे जिल्ह्यातील सर्व विभागांना स्पष्ट दिशा मिळाली त्यासर्व संबंधीत शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच बुलडाणा जिल्ह्याची सुव्यवस्था राखणारे सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यामुळे विकासाच्या उद्दिष्टांकडे एकजुटीने वाटचाल करता आली.

तसेच सर्व विभागप्रमुखांनी आपल्या आपल्या क्षेत्रात घेतलेली मेहनत, समन्वयाने केलेले काम आणि प्रशासनातील संपूर्ण टीमची समर्पित भावना यामुळेच आज बुलढाणा जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. राज्यातील बहुतेक जिल्ह्यांची आर्थिक वाढ १०-१३% च्या दरम्यान असताना बुलढाणा जिल्ह्याने २२.६% वाढ नोंदवून विकासाचा नवा मापदंड निर्माण केला आहे.

आदरणीय जिल्हाधिकारी महोदय, सर्व विभागप्रमुख आणि संपूर्ण जिल्हा प्रशासन टीमचे मनःपूर्वक अभिनंदन ! ही कामगिरी केवळ एक आकडा नाही, तर सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि एकजुटीच्या टीमवर्कचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ''योग्य नेतृत्व आणि समर्पित टीम असेल तर कोणतेही उद्दिष्ट अशक्य नाही - बुलढाणा जिल्ह्याने ते सिद्ध करून दाखवले आहे.'' बुलढाणा जिल्ह्याचे जी. डी. पी. वाढण्यास मुख्य कारण कृषी क्षेत्रामध्ये झालेली क्रांती जसे बुलढाणा घाटमाथ्यावर झालेले सिड हब शेतकऱ्यांनी अवलंबलेली आधुनिक शेती प्रणाली जसे पॉलीहाऊस यामुळे हे शक्य झाले. त्याकरीता सर्व शेतकरी बांधवांचे सुध्दा मनापासून धन्यवाद !

**जिल्ह्यातील निर्यात ८७४ वरुन पंधराशे कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट!**
'महा निर्यात इग्नाईट कन्व्हेन्शन' कार्यशाळा: कृषी उद्योग उभारण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**बुलढाणा जिल्हा नवउद्योग मंजुरीत राज्यात चौथा**
८३० प्रस्तावांना मान्यता; ३३० उद्योग उभारले
**३७८६**
प्रस्तावांना विभागात मंजुरी देण्यात आली.

बुलडाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा हा तुरा रोवण्यात, अर्थव्यवस्थेला अधिक गतिशील ठेवण्यासाठी बुलडाणा अर्बन परिवाराचे महत्वपूर्ण योगदान बुलढाणा जिल्ह्यातील एकूण रु. ५१८८.०० कोटीचा व्यवसाय याला जिल्ह्यातील संस्थेच्या१०६ गोदाम व २ कोल्ड स्टोरेजची जोड मिळाली आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

... शुभेच्छुक...


**डॉ.सुकेश झंवर**
अध्यक्ष, बुलढाणा अर्बन


**राधेश्याम चांडक (भाईजी)**
संस्थापक अध्यक्ष, बुलढाणा अर्बन


**सौ. कोमलताई झंवर**
अध्यक्षा, बुलढाणा अर्बन चॅरीटेबल

**व सर्व संचालक मंडळ, बुलढाणा अर्बन परिवार**

Buldana Urban
Co-op. Credit Society Ltd., Buldana
Multi-state R. No. 267
बुलडाणा अर्बन



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८